# ‘स्व’—रूपवर्धिनी

## स्पर्धा परीक्षा केंद्र

# माहितीपत्रक

### ‘विकसित व्हावे अर्पित होऊनी जावे’

समाजाच्या सर्व स्तरातील गुणवत्तेचा शोध घेऊन तिच्या विकासासाठी सुयोग्य वातावरण व संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न ‘स्व’—रूपवर्धिनी गेली ३७ वर्षे करीत आहे. सामाजिक जाणिवेचे नेतृत्व तयार करणे हा संस्थेच्या कामाचा गाभा आहे. या व्यक्तिमत्व विकासाच्या प्रक्रियेचा एक भाग म्हणून संस्थेच्या वाढीच्या विशिष्ट टप्प्यावर ‘स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र’ सुरू करण्यात आले.

‘स्व’—रूपवर्धिनी काम करीत असलेल्या पुणे शहराच्या पूर्व भागात सुसज्ज संदर्भ ग्रंथालय, प्रशस्त अभ्यासिका व सुयोग्य मार्गदर्शनाची सोय असलेल्या अशा केंद्राची आवश्यकता होती. ही गरज लक्षात घेऊन वर्ष २००० मध्ये वरील केंद्र सुरू करण्यात आले. आज पर्यंत केंद्रातून मार्गदर्शन घेतलेले अंदाजे १८० हून अधिक विद्यार्थी प्रशासनात विविध स्तरांवर अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.

उत्तम नेतृत्वगुण व सचोटी असणारे अनेक तरूण तरूणी समाजात आहेत, ज्यांची प्रशासनाला गरज आहे. परंतु आर्थिक व अन्य समस्यांमुळे ही मुले पुढे येऊ शकत नाहीत व त्यांना सुयोग्य मार्गदर्शन मिळत नाही. या समस्येवरील एक उपाय म्हणून ‘स्व’—रूपवर्धिनीने २०१६—२०१७ सालासाठी शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत राज्यसेवा मार्गदर्शन वर्गाचे आयोजन केले आहे. या योजनचे हे ६ वे वर्ष आहे. या योजनेद्वारे प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना संस्थेची निवड चाचणी परीक्षा व मुलाखत द्यावी लागेल त्यातून निवड झालेल्या ५० विद्यार्थ्यांना हे मार्गदर्शन मोफत केले जाईल.

‘विकसित व्हावे! अर्पित होऊनी जावे!!’ या सूत्राप्रमाणे स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून सामाजिक जाणीव असणारे उत्तम प्रशासक तयार करणे हे केंद्राचे उदद्ष्टि आहे. विविध पातळयांवरील स्पर्धा परीक्षांची तयारी हे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाचे एक उत्तम माध्यम ठरू शकते. त्यामुळेच विद्यार्थ्यांच्या क्षमतांचा कस लागेल आणि त्यांच्या गुणवत्तेचा विकास होईल.

स्पर्धा परीक्षा केंद्राच्या कामात तज्ज्ञ व्यक्तींसोबतच विद्यार्थ्यांचाही सहभाग असतो . ‘‘विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांसाठी चालवलेला उपक्रम’’ असे केंद्राचे स्वरुप आहे. यामुळे अभ्यास करता करता विद्यार्थ्यांच्या नेतत्च गुणांचा व सामाजिक जाणिवांचा विकास होतो . अशा रीतीने चारित्र्यवान व समाजाभिमुख अधिका-यांची फळी केंद्राच्या माध्यमातून निर्माण होत आहे.

# ‘स्व’—रूपवर्धिनी

## स्पर्धा परीक्षा केंद्र

### (राज्य लोकसेवा आयोग पूर्व व मुख्य परीक्षा प्रशिक्षण कार्यक्रम रचना)

‘स्व’—रूपवर्धिनीच्या स्पर्धा परीक्षा केंद्रामार्फत महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे सन २०१६/१७ मध्ये होणाऱ्या नागरी सेवा परीक्षेसाठी महाराष्ट्रातील गुणवंत, विशेषतः गरजू व ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना आहे. या योजनेअंतर्गत लेखी परीक्षा व मुलाखती द्वारा निवड झालेल्या विद्यार्थ्यांना M.P.S.C-२०१६/२०१७ परीक्षेसाठी संपूर्ण विनामूल्य मार्गदर्शन, अभ्यासिका व ग्रंथालय उपलब्ध करून देण्यात येत आहे.

शिष्यवृत्ती योजनेची प्रशिक्षण कार्यक्रम रचना पुढील प्रमाणे :—

**१) विषय अध्यापन :** पूर्व परीक्षा पेपर १,२ व मुख्य परीक्षेच्या मराठी, इंग्रजी, सामान्य अध्ययन I, II, III व IV विषयाचे संपूर्ण परीक्षाभिमुख मार्गदर्शन सोमवार ते शनिवार सायं. ५ ते ७ व रविवारी आवश्यकतेनुसार सोईच्यावेळी जादा वर्ग घेतले जातील.

**२) परीक्षा :** शिकवून झालेल्या अभ्यासक्रमावर आधारित नियमित टप्प्याने परीक्षा होतील. तसेच आयोगाच्या पूर्व व मुख्य परीक्षेच्या आधी, संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित सराव परीक्षा (TEST SERIES) घेण्यात येतील. या परीक्षांसाठी पूर्वतयारी करूनच उपस्थित राहणे अनिवार्य असेल.

**३) गट चर्चा व विद्यार्थ्यांची व्याख्याने :** विद्यार्थ्यांनी नियमितपणे गटामध्ये अभ्यास करण्यावर मुख्यतः भर असेल. राष्ट्रीय, जागतिक घटनांवर गटचर्चेच्या माध्यमातून विचारांची देवाण—घेवाण करण्याकरिता जागा उपलब्ध केली जाईल.

**४) अधिकारी भेटी :** राज्यसेवा परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व प्रशासकीय सेवेत असलेल्या विविध अधिकाऱ्यांबरोबर अनुभवांची देवाण—घेवाण होईल, असे प्रेरणात्मक कार्यक्रम आयोजित केले जातील.

**५) विनामूल्य अभ्यासिका :** निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना दररोज सकाळी ६.०० ते रात्री १२.०० वा.पर्यंत अभ्यासिका विनामूल्य उपलब्ध असेल.

**६) विनामूल्य ग्रंथालय :** केंद्रामध्ये सुसज्ज ग्रंथालय उपलब्ध आहे. स्पर्धा परीक्षांना उपयुक्त अशी सर्व विषयांची पुस्तके, गाईड्स, प्रश्नसंच तसेच, विविध प्रकारची वर्तमानपत्रे, नियतकालिके उपलब्ध असतील. **ग्रंथालयाची वेळ :— सोम ते शनि ११.३० ते ४.३० वा.**

**७) उपासना/प्रार्थना :** स्पर्धा परीक्षा केंद्राची दैनंदिन प्रार्थना व साप्ताहिक उपासना होईल. दररोज वर्ग सुरू होताना विद्यार्थी ओमकार म्हणतील व वर्ग संपताना प्रार्थना म्हणतील.

**८) विशेष सूचना :** विद्यार्थ्यांच्या काही सूचना किंवा अडचणी असल्यास थेट केंद्रामध्ये संपर्क साधावा. मो. क्र. ८१४९९९३२३८

email Id: swaroopwardhinee.cec@gmail.com
Facebook Id: Swa Roopwardhinee

# ‘स्व’ –रूपवर्धिनी

## स्पर्धा परीक्षा केंद्र

## ‘प्रवेश परीक्षेसंबंधी महत्वाची माहिती’

**१)** विद्यार्थ्याने अर्ज अचूक व पूर्ण भरावा. अपूर्ण अर्जाचा विचार केला जाणार नाही.

**२)** प्रवेश परीक्षेस पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची मुलाखत घेतली जाईल व त्यानंतर अंतिम निवड करण्यात येईल. संस्थेचा निर्णय अंतिम असेल.

**३) शिष्यवृत्ती योजने संदर्भात कोणतेही बदल अथवा फेरफार करायचे संपूर्ण हक्क संस्थेकडे राहतील.**

**४) प्रवेश परीक्षेबाबत –**

प्रवेश परीक्षेचे स्वरूप – सदर परीक्षा राज्यसेवा पूर्व परीक्षेच्या अभ्यासक्रमावर आधारित वस्तुनिष्ठ स्वरूपाची राहिल.

प्रवेश परीक्षा :– रविवार, दिनांक १४ ऑगस्ट २०१६

परीक्षेची वेळ :– (Hall Ticket) प्रवेश पत्रावर दिल्याप्रमाणे

परीक्षेचे स्वरूप :– वस्तुनिष्ठ १०० प्रश्न G.S. ६०/ C.SAT ४० प्रश्न – २०० गुण

**५) प्रवेश अर्ज व परीक्षा शुल्का बाबत**

१) परीक्षेसाठीचे अर्ज हे http://www.swaroopwardhinee.org या संकेत स्थळावरून विद्यार्थ्यांनी डाऊनलोड करून त्याची प्रिंट आऊट काढावी किंवा माहिती पत्रक व अर्ज संस्थेच्या कार्यालयीन वेळेत विनामूल्य उपलब्ध असतील तेथून घ्यावेत.

२) प्रवेश परीक्षा **शुल्क** रू ५०/– हे अर्जासोबत रोखीने प्रत्यक्ष दिनांक ३१जुलै २०१६ पर्यंत **‘स्व’ रूपवर्धिनी पुणे** येथे कार्यालयीन वेळेत स. ११.३० ते ५.३० स्विकारले जाईल.

३) बाहेरगावच्या विद्यार्थ्यांचे अर्ज पोस्टाने स्विकारले जातील. व प्रवेश परीक्षा शुल्क भरल्यानंतर (Hall Ticket) प्रवेश पत्र दिले जाईल.

**६) प्रवेश परीक्षेची अर्हता** –

१) कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाचा पदवीधर.

२) महाराष्ट्राचा रहिवासी असावा.

**७) अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे**

१) अर्जदाराचे पासपोर्ट आकाराचे २ फोटो.

२) डिग्री सर्टिफिकेटची एक झेरॉक्स प्रत.

३) ओळखपत्राची झेरॉक्स प्रत फोटो आयडी

### * वेळापत्रक *

**प्रवेश परीक्षा :** १४ ऑगस्ट २०१६

**प्रवेश परीक्षा निकाल : २५** ऑगस्ट २०१६

**मुलाखत :** २९ ऑगस्ट ते १० सप्टेंबर २०१६

**अंतिम निवड यादी :** १९ सप्टेंबर २०१६

**मार्गदर्शन वर्ग सुरुवात :** २६सप्टेंबर २०१६

**८)** मुलाखतीस पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना पत्राद्वारे तसेच भ्रमणध्वनीद्वारे कळविण्यात येईल. अंतिम निवड झालेल्या विद्यार्थ्यांची सूची संस्थेच्या सूचना फलकात व वेबसाईटवर लावली जाईल.

**९)** प्रवेश परीक्षेचे संदर्भात सर्व हक्क संस्थेच्या अधिन असतील.

Application No. ☐☐☐☐☐

# ‘स्व’—रूपवर्धिनी

स्पर्धा परीक्षा केंद्र, २२/१,मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे ४११०११ http://www.swaroopwardhinee.org

फोन नं.०२०—२६१२१७०४,८१४९९९३२३८

## APPLICATION FORM

**Dear Sir,**
**Please enroll my name for the ‘Swa’- Roopwardhinee CEC’ entrance examination for the year 2016-17.**

**My details are as follows:**

**1.** FULL NAME IN (IN BLOCK LETTERS):

SURNAME:

NAME:

FATHER’S / HUSBAND’S NAME

NAME IN DEVNAGARI: ..........................................................................................

**2.** DATE OF BIRTH:

**3.** GENDER: M ☐ F ☐

**4.** PERMANENT ADD: ..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

AT POST: ................ TAL: ...................... DIST: .................... PIN :

**5.** STD CODE: TEL NO.:

MOB NO.:

EMAIL ID ..........................................................................................

**6.** MARITAL STATUS (TICK MARK) : SINGLE / MARRIED / WIDOW (ER)
IF MARRIED, NAME OF WIFE/ HUSBAND: ..........................................................................

**7.** **GENERAL EDUCATIONAL QUALIFICATION**

| S. NO. | EXAMINATIONS, CERTIFICATES, DIPLOMAS, DEGREES PASSED OR OBTAINED | NAME AND ADDRESS OF SCHOOL OR COLLEGE UNIVERSITY / INSTITUTION ETC. | YEAR OF PASSING | CLASS OR GRADE |
|---|---|---|---|---|
| 1 | **10 th** | | | |
| 2 | **12 th** | | | |
| 3 | **Degree** | | | |
| 4 | **Post Graduation** | | | |
| 5 | **Other** | | | |

**8.** **FAMILY DETAILS**

| S. NO. | NAME OF FAMILY MEMBER | RELATION WITH APPLICANT | EDUCATION | OCCUPATION | ANNUAL INCOME |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

**9.** HOBBIES : ...................................................................................................................

**10.** DETAIL OF PREVIOUS COMPETITIVE EXAM

| NAME OF EXAM | YEAR | PRELIM | MAINS | INTERVIEW |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

I have read the Rules / Instructions of the 'Swa'- Roopwardhinee CEC and they are binding on me.

The information given above is 'True and Correct' to the best of my knowledge and belief. I will be fully liable for disciplinary action, as per rules and regulations of 'Swa'- Roopwardhinee CEC, if any kind of discrepancy is found.

DATE: NAME: ........................................................................

PLACE: CANDIDATE'S SIGNATURE

.

Application No. | | | | | |

# ‘स्व’—रूपवर्धिनी

स्पर्धा परीक्षा केंद्र, २२/१,मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे ४११०११ http://www.swaroopwardhinee.org

फोन नं.०२०—२६१२१७०४, ८१४९९९३२३८

## HALL TICKET

**‘SWA’- ROOPWARDHINEE COMPETITIVE EXAM CENTRE**

**NAME OF THE CANDIDATE:** ..........................................................................

**PLACE OF EXAM:** मुलींचे आगरकर हायस्कूल,
सोमवार पेठ, बँक ऑफ महाराष्ट्र शेजारी,
अपोलो टॉकीज जवळ पुणे.

**DATE OF EXAM**: १४ ऑगस्ट २०१६

**TIME OF EXAM:** सकाळी १०.३० ते दुपारी १२.३०

## नियम व अटी-

१) ज्या उमेदवारांचे अर्ज परिपूर्ण असून आवश्यक परीक्षा शुल्क भरलेले आहे त्यांनाच परीक्षेला प्रवेश दिला जाईल.


२) परीक्षेच्या वेळी प्रवेश पत्र (HALL TICKET) आणणे बंधनकारक आहे.

३) परीक्षेसाठी निर्धारित केलेल्या वेळेपूर्वी संबंधीत केंद्रावर किमान अर्धा तास अगोदर उपस्थित राहणे बंधनकारक आहे.

४) विलंबाबाबत कोणत्याही कारणाचा संस्थेकडून विचार केला जाणार नाही व यासंबंधीची जबाबदारी संबधीत उमेदवाराची राहील.

५) प्रवेशपत्रावर संस्थेचा शिक्का असणे बंधनकारक आहे अन्यथाऽ प्रवेश दिला जाणार नाही.

६) परीक्षेच्या वेळी मोबाईल (Mobile) व (Calculator) गणकयंत्र वापरण्यास मनाई आहे.


शनिवारवाडा
पुणे मनपा
सूर्या हॉस्पिटल
कमला नेहरू हॉस्पिटल
बाबुराव सणस कन्या शाळा
पारगे चौक
तोडकर हॉस्पीटल
'स्व'-रूपवर्धिनी
आंबेडकर भवन
पुणे स्टेशन